सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे

जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे द्वारा जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविण्यपुर्ण योजने मधुन सन २०२२ -२३ साठी प्राप्त अनुदानातुन धुळे जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना यु.पी.एस.सी. / एम. पी. एस.सी. राज्य सेवा परीक्षा ( **नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम** ) तसेच विविध पद भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या सरळसेवा भरती साठी घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या पुर्व तयारीसाठी मराठीतुन ऑनलाईन प्रशिक्षण देणेकामी, अनुभवी संस्थेची ( अशासकिय / खाजगी ) निवड करणेसाठी, जाहीर ई-निविदा.

## ई-निविदा
## सन २०२२-२३

**प्रेषक;**
**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय**, धुळे
**जिल्हा क्रीडा संकुल, वाडीभोकर रोड, धुळे**

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे

जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे द्वारा जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविण्यपुर्ण योजने मधुन सन २०२२ -२३ साठी प्राप्त अनुदानातुन धुळे जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना यु.पी.एस.सी. / एम. पी. एस.सी. राज्य सेवा परीक्षा ( नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम ) तसेच विविध पद भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या सरळसेवा भरती साठी घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या पुर्व तयारीसाठी मराठीतुन ऑनलाईन प्रशिक्षण देणेकामी, अनुभवी संस्थेची ( अशासकिय / खाजगी ) निवड करणेसाठी, जाहीर ई-निविदा.

**संदर्भ:**

1) शासन निर्णय क्रमांक डिएपी १०१४ / प्र.क्र. १९८/ का.१४८१ दिनांक २७.०८.२०१४
2) मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग, नाशिक यांचे तांत्रिक मंजुरी आदेश क्रमांक उपसंक्री/ ना. पुर्ण योजना / तांत्रिक मान्यता / २०२२ — २३ / १७७३ / का. ०३ दिनांक २७ मार्च २०२३.
3) मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती धुळे यांचे प्राशासकीय सर्वसाधारण मंजूरी आदेश क्र. जिनिस/O/2023/Mar/CombineA.A.03886 दिनांक 31.03.2023.

४) शासन निर्णय क्रमांक भांखस — २०१४ /प्र.क्र. ८२ / भाग III / उद्योग — ४ दिनांक ०१ डिसेंबर २०१६

**<u>निविदेची किंमत रु. १५०००/- (अक्षरी रु. पंधरा हजार रुपये फक्त)</u>**

जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे द्वारा जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविण्यपुर्ण योजने मधुन सन २०२२ -२३ साठी प्राप्त अनुदानातुन धुळे जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना यु.पी.एस.सी. / एम. पी. एस.सी. राज्य सेवा परीक्षा ( नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम २०२५ ) तसेच विविध पद भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या सरळसेवा भरती साठी घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या पुर्व तयारीसाठी मराठीतुन ऑनलाईन प्रशिक्षण देणेकामी, अनुभवी संस्थेची निवड करणेसाठी, परवानाधारक / नोंदणीकृत ( अशासकिय / खाजगी ) अनुभवी संस्थांकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

१) कोऱ्या निविदा अर्जाची किंमत रु. १५,००० /- (अक्षरी रु. पंधरा हजार मात्र) प्रति अर्ज इतकी राहील. ही रक्कम जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचे खात्यात ऑनलाईन गेट-वे प्रक्रीयेव्दारे भरणा करावी. सदर रक्कम नापरतावा असेल याची नोंद घ्यावी.

२) निविदेसोबत रु. २.२५,०००/- <u>(अक्षरी रु. दोन लाख पंचविस हजार फक्त)</u> इतकी बयाना रक्कम जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचे खात्यात ऑनलाईन गेट-वे प्रक्रीयेव्दारे भरणा करावी. सदर रक्कम बिनव्याजी असेल याची नोंद घ्यावी.

३) कोऱ्या निविदा, अटी व शर्तीबाबतची सविस्तर माहिती दि. ०३ ते १४ जुलै २०२३ या कालावधीत <u>https://mahatenders.gov.in</u> या वेबसाईट वर तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपलब्ध आहे.

४) कोऱ्या निविदा दि. ०३ जुलै २०२३ रोजी सकाळी १०.०५ वाजे पासून ते दि. १४ जुलै २०२३ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत या कालावधीत ऑनलाईन वेबसाईट व्दारे डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध होतील.

५) निविदे संदर्भात निविदा पूर्वबैठक / Pre_Bid_Meeting ०६ जुलै २०२३ दुपारी १२:०० वा. जिल्हा क्रीडा अधिकारी,धुळे यांच्या कार्यालयात संपन्न होईल

६) पूर्णपणे भरलेल्या ऑनलाईन निविदा <u>https://mahatenders.gov.in</u> दिनांक १४ जुलै २०२३ रोजी सायंकाळी १८.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

७) विहित मुदतीत प्राप्त निविदे मधील तांत्रिक लिफापे ऑनलाईन पध्दतीने जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचे कार्यालयात दि. १७ जुलै २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील.

८) संबंधित निविदाकारास किंवा निविदाकाराने नियुक्त केलेल्या एका प्रतिनिधीस प्राधिकार पत्रासह निविदा उघडतांना उपस्थित राहता येईल.

९) निविदा उघडण्याच्या दिनांक व वेळेत बदल करण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांनी राखून ठेवलेला आहे.

१०) प्रमाणित करण्यात येते की,या निविदेमध्ये एकूण २१ पृष्ठे आहेत.

**जिल्हा क्रीडा अधिकारी,धुळे.**

# **अटी व शर्तींचा तपशील**

1. **जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे द्वारा जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविण्यपुर्ण योजने मधुन सन २०२२ -२३ साठी प्राप्त अनुदानातुन धुळे जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना यु.पी.एस.सी. / एम. पी. एस.सी. राज्य सेवा परीक्षा ( नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम ) तसेच विविध पद भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या सरळसेवा भरती साठी घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या पुर्व तयारीसाठी मराठीतुन ऑनलाईन प्रशिक्षण अंतर्गत ऑनलाईन प्रशिक्षणसाठी खालील विषय समाविष्ठ असतील.**

**A ) सरळसेवा परीक्षांसाठी :-**

| | |
|---|---|
| 1 | सामान्य अध्ययन |
| 2 | गणित व बुद्धिमत्ता |
| 3 | मराठी |
| 4 | इंग्रजी |

**B ) यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम 2025) परीक्षांसाठी**

| | |
|---|---|
| 1 | **पूर्व परीक्षा प्रशिक्षण :** |
| A | सामान्य अध्ययन व सी-सॅट |
| 2 | **मुख्य परीक्षा प्रशिक्षण :** |
| A | निबंध |
| B | सामान्य अध्ययन पेपर I-IV |
| C | अनिवार्य/अर्हताकारी मराठी व इंग्रजी |

**C ) वरील दोनही परीक्षांच्या मुलाखतीची तयारी करून घेणे.**

2. **प्रशिक्षण (Coaching) बाबत संक्षिप्त माहिती**

प्रशिक्षण कार्यक्रम नक्की काय आहे?

**A ) सरळसेवा परीक्षांसाठी :-**

अर्ज करणारे किमान 6190 विद्यार्थी किंवा अर्ज करणारे सर्वच पात्र विद्यार्थी यांपैकी जी संख्या अधिक तेवढ्या विद्यार्थ्यांना सरळ सेवा परीक्षांसाठी (ग्रामसेवक, तलाठी, वनरक्षक, जिल्हा परिषद भरती, पोलीसभरती, रेल्वे व इतर पदांसाठी) परीक्षापूर्व प्रशिक्षण दिले जाईल.

**B ) यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम 2025) परीक्षांसाठी**

UPSC नागरी सेवा परीक्षा / MPSC राज्यसेवा नवीन पॅटर्न (2025)-पूर्व + मुख्य + मुलाखत यासाठी मराठी माध्यमातून जिल्ह्यातील 501 गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना डीपीडीसी निधीतून या कार्यक्रमद्वारे ऑनलाइन परीक्षापूर्व मार्गदर्शन केले जाईल.

3. ऑनलाइन शंका निरसन कार्यशाळा निवड झालेल्या संस्थेस वेळोवेळी आयोजित करणे बंधनकारक राहील.

4. **प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या निवडीचे निकष**

**A ) सरळसेवा परीक्षांसाठी :-**

१. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असणाऱ्या अर्ज केलेल्या सर्वच पात्र विद्यार्थ्यांना सरळसेवा परीक्षांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येईल.

२. प्रशिक्षणासाठी प्रवेश घेवु इच्छिणारा प्रशिक्षणार्थी किमान १२ वी उतिर्ण असावा.

३. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असल्याबाबत तहसिलदार यांनी दिलेले रहीवास प्रमाणपत्र / आधाकार्ड / रेशनकार्ड / ड्रायव्हिंग लायसेंन्स इत्यादी ग्राह्य धरण्यात येईल.

**B ) यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम 2025) परीक्षांसाठी**

१. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असणाऱ्या अर्ज केलेल्या ५०१ पात्र विद्यार्थ्यांना **यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम** 2025) परीक्षांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येईल.
२. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असल्याबाबत तहसिलदार यांनी दिलेले रहीवास प्रमाणपत्र / आधारकार्ड / रेशनकार्ड / ड्रायव्हिंग लायसेंन्स ग्राह्य धरण्यात येईल.
३. प्रशिक्षणासाठी प्रवेश घेवु इच्छिणारा प्रशिक्षणार्थी हा किमान पदवीधर असावा किंवा पदवीच्या शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेत असावा.
४. प्रशिक्षणासाठी प्रवेश घेवु इच्छिणारा प्रशिक्षणार्थी हा पदवीच्या शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेत असल्यास तसा दाखला तो शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्यासह सादर करणे बंधनकारक राहील.
५. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असणाऱ्या व संपूर्ण कुटुंबाचे गेल्या आर्थिक वर्षातील उत्पन्न रु. 8 लाखांपेक्षा जास्त नसणाऱ्या अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी 501 विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल.
६. प्रशिक्षणासाठी निवड करतांना अर्जदार विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन, खालील प्रमाणे प्रवेश देण्यात येईल .

| **12 वी शाखा** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|
| कला | १६७ |
| विज्ञान | १६७ |
| वाणिज्य | १६७ |
| एकूण विद्यार्थी | ५०१ |

७. वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व शाखा मधुन प्रत्येकी १६७ विद्यार्थी संख्या उपलब्ध न झाल्यास, याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांना राहील.
८. ऑनलाईन प्रशिक्षणासाठी प्रवेश घेवु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने यापुर्वी इतर कोणत्याही शासकिय किंवा निमशासकिय संस्थेमधुन ( महाज्योती / सारथी किंवा टी.आर. टी.टी. ) यु.पी.एस.सी. किंवा एम.पी.एस.सी. परीक्षापुर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा. यासाठी सबंधित विद्यार्थ्याचे स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे.

## 5. प्रशिक्षणाचा कालावधी :

**A ) सरळसेवा परीक्षांसाठी :-**

प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर तीन महीने

**B ) यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम 2025) परीक्षांसाठी**

**प्रशिक्षण सुरु झाल्यांनतर पुढील आठ महीने**

## 6. प्रशिक्षण संस्थेची जबाबदारी

१. सरळसेवा परीक्षा आणि MPSC/UPSC या परीक्षांसाठी स्वतंत्र अँड्रॉइड ऍप्लिकेशन्स विकसित करणे. विकसित केलेल्या अॅण्ड्रॉईड ऍप्लिकेशनचा डेमो निविदा समितीस द्यावा लागेल.

२. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे यांच्या वतीने या प्रशिक्षण कामासाठी अंतिम निवड झालेल्या संस्थेने या योजनेची जाहीरात संपुर्ण घुळे जिल्ह्यामध्ये करावयाची आहे. या उपक्रमांची जाहीरात करण्यासाठी येणारा सर्व खर्च निवड झालेल्या प्रशिक्षण संस्थेने करावयाचा आहे, यासाठी कोणतेही अतिरीक्त शुल्क सबंधित संस्थेस अदा करण्यात येणार नाही.

३. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण देणे.

४. नियमित सराव परीक्षा घेणे.

7. **प्रशिक्षणाचे माध्यम :** मराठी माध्यम

8. **प्रशिक्षणाचे स्वरूप :** ऑनलाईन स्वरूप

9. संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असावे, सदर लेखा परीक्षण अहवाल सोबत सादर करणे आवश्यक राहील. या लेखापरिक्षण अहवालात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नसावेत. असे गंभीर स्वरूपाचे आक्षेप असल्यास सदर संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही.

10. विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेमध्ये संस्थेचा सहभाग बंधनकारक असेल. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाबाबत माहिती व्हावी यासाठी विविध माध्यमांद्वारे जागरूकता पसरवण्याची व किमान पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन घेवुन, त्यांना सरळसेवा परीक्षेचे प्रशिक्षण दिले जाईल याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेची असेल.

11. स्पर्धा परीक्षांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून युपीएससी व राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी 12 वी मधील गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड प्रक्रियेमध्ये प्रशिक्षण संस्थेचा सहभाग असेल.

12. जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी वेळोवेळी या संस्थेची पाहणी करतील व त्याबाबतचा अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांना सादर करतील.

13. संस्थेच्या कामावर सनियंत्रण ठेवणे, मुल्यमापन करणे या बाबतची कार्यवाही करणे इ. बाबींचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचेकडे राहतील.

14. निविदाधारक संस्थेच्या ऑनलाइन केंद्रामध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास, संस्था अयोग्य आहे असे आढळल्यास संस्थेचे प्रशिक्षण केंद्र बंद करण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांनी राखुन ठेवला आहे.

15. या प्रशिक्षणाचा लाभ लाभार्थीना फक्त प्रशिक्षण कालावधी संपेपर्यंतच असेल.

16. यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा (नवीन वर्णनात्मक अभ्यासक्रम 2025) व सरळ सेवा परीक्षांसाठी व इतर तत्सम स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या कामाचा निविदेत सहभागी होणाऱ्या संस्थेकडे किमान ३ वर्ष पूर्व अनुभव असणे आवश्यक आहे.

17. निविदेत सहभागी झालेल्या संसथेमधुन प्रशिक्षण घेवून यूपीएससी नागरी सेवा परीक्षा/एमपीएससी राज्यसेवा परीक्षेतून शासकीय सेवेत निवड झालेल्या उमेदवारांची यादी परीशिष्ट – अ ( ३ ) " मध्ये निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील.

18. **निविदा सादर करताना सरळसेवा परीक्षा किंवा यु.पी.एस.सी. नागरी सेवा परीक्षा / राज्यसेवा वर्णनात्मक नवीन अभ्यासक्रम २०२५ या पैकी किमान एका परीक्षेच्या संपुर्ण अभ्यासक्रमाची मराठी माध्यमातील पुस्तिका / अभ्यास साहित्य / पुस्तकांचा संच, ऑनलाईन निविदा उघडण्याच दिवशी म्हणजेच दिनांक १७ जुलै २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपुर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, वाडीभोकर रोड , धुळे येथे सादर करणे बंधनकारक राहील. सदर अभ्याससाहित्य हे निविदा सादर करणाऱ्या संस्थेने स्वत: प्रकाशित केलेले असावे.**

19. **ऑनलाईन निविदा सादर करावयाच्या अंतिम तारखे पर्यंत जे निविदाधारक ऑनलाईन निविदा सादर करतील, त्या सर्व निविदा धारकांचे तांत्रिक लिफापे दिनांक** १७ जुलै २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील.

20. **दिनांक १७ जुलै २०२३ रोजी उघडण्यात येणाऱ्या तांत्रिक लिफाप्यामधील कागदपत्रांची तपासणी केल्या नंतर , जे निविदाधारक तांत्रिक कागदपत्रांमध्ये पात्र ठरतील, अशाच पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या मराठी माध्यमांच्या पुस्तिका / अभ्यास साहीत्य / पुस्तकांचा संच** यांचे मुल्यमापन जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांच्या मार्फत नियुक्त केलेल्या तज्ञ व्यक्तींच्या पॅनल कडुन करुन घेण्यात येईल.

21. **सरळसेवा परीक्षा किंवा यु.पी.एस.सी. नागरी सेवा परीक्षा / राज्यसेवा वर्णनात्मक नवीन अभ्यासक्रम २०२५ या पैकी किमान एका परीक्षेच्या संपुर्ण अभ्यासक्रमाची मराठी माध्यमातील पुस्तिका / अभ्यास साहित्य / पुस्तकांचा संच सादर करावा लागेल**

22. **कार्यालयात प्राप्त होणाऱ्या व प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या मराठी माध्यमांच्या पुस्तिका / अभ्यास साहीत्य / पुस्तकांचा संच यांचे मुल्यमापन तज्ञ व्यक्तींच्या पॅनलने केल्यानंतर व त्याचे गुणांकण** जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे

यांना प्राप्त झाल्यानंतर ,समितीकडुन प्राप्त झालेले गुण त्या त्या निविदाधारकाच्या तांत्रिक गुणांकनामध्ये मिळविण्यात येतील.

23. कोणतीही निविदा अथवा सर्व प्राप्त निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळ यांनी राखून ठेवलेले आहेत.

24. निविदा स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय / अंतिम अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांना राहील.

25. निविदेसंबंधी काही कायदेशीर वाद अथवा अडचण निर्माण झाल्यास या बाबत धुळे येथील सक्षम न्यायालयातच दावा दाखल करणे बंधनकारक राहील.

26. निविदा नाकारल्यानंतर अथवा रद्द केल्यानंतर त्या संबधीची कारणे निविदा दाखल करणाऱ्या संस्थेस लेखी अथवा तोंडी स्वरुपात कळविणे बंधनकारक असणार नाहीत.

27. निविदेत प्रशिक्षणाचे दर नमूद करतांना खालील बाबी विचारात घेण्यात येईल

**अ.** अंमत: मान्य करण्यात आलेले दर संपूर्ण कराराच्या कालावधीत बदलता येणार नाहीत.दर कमी करण्याचा अधिकार निविदा समितीस राहील.

**ब.** निविदेत नमूद केलेले दर सादर करताना सर्व करांचा विचार करुन सर्व प्रकारचे करासहित नमूद करावेत.

**क.** निविदे सोबत दिलेल्या प्रपत्रा प्रमाणेच दर देणे बंधनकारक राहील.

**ड.** अक्षरी व अंकी दरामध्ये तफावत असल्यास त्यादोन्ही पैकी कमी असलेली किंमत विचारात घेतला जाईल.

**इ.** निविदेचा निकाल अधिसुचित करण्यात आल्यानंतर, निविदाकाराने पंधरा दिवसाचे आत जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचे बरोबर महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग – ८ / असाधारण दिनांक २४/०४/२०१५ क्रमांक ४७ महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट ( अमेनमेंट ॲक्ट २०१५ ) नुसार एकुण **कामाच्या मुल्यामधील पहील्या रु.१०.००** लक्षपर्यंतच्या रकमेवर रु. ५००/- आणि त्यानंतरच्या एकुण रकमेच्या ०.१ टक्के असे **मिळुन एकुण रक्कम** निश्चित करुन, तेवढ्या रकमेच्या शासकीय मुद्रांकावर करारनामा करावा लागेल.

28. **देयक प्रदान** – प्रशिक्षणसाठी निवड करण्यात आलेल्या संस्थेस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रशिक्षणाच्या विविध

टप्यानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. याबाबत **संस्थेसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये सविस्तर** तपशिल नमुद करण्यात येईल. **सबंधितांना देयकाची रक्कम आर.टी.जी.एस द्वारे** अथवा धनादेशाव्दारे **अदा करण्यात येईल. सदर देयक अदा करतांना** शासन नियमानुसार कपात करण्यात येणारे सर्व कर कपात करुन, उर्वरीत रक्कम सबंधितांना अदा करण्यात येईल, **प्रशासकीय किंवा इतर कारणास्तव** देयक अदा करण्यास **विलंब झाल्यास सदर देयक रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.**

**जिल्हा क्रीडा अधिकारी,**
**धुळे.**

## खालील कारणास्तव निविदा नाकारण्यात येतील.

१. निविदा फॉर्म अर्धवट / अपु-या माहितीसह सादर केल्यास.

२. निविदेमध्ये दिलेली बयाणा रक्कम रुपये ऑनलाई न भरणा करुन त्याचे चलन सोबत सादर केलेले नसल्यास.

३. आवश्यक ती सर्व कागदपत्रे ऑनलाईन तसेच ऑफलाईन सादर केलेली नसल्यास.

४. ज्याच्या नावाने निविदा सादर केल्या आहेत त्याच नावाने कागदपत्रे नसल्यास.

५. दराबाबत संदिग्धता किंवा खाडाखोड असल्यास.

६. उत्पादकाने निविदेमध्ये काही अटी व शर्ती नमूद केल्यास.

७. सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली कागदपत्रे ऑनलाईन सादर न केल्यास.

८. कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा कोणत्याही मार्गाने निविदा स्वीकृतीसाठी प्रयत्न केल्यास.

९. कामाचे अनुभव प्रमाणपत्र व त्याचे कार्यादेश आणि इतर कागदपत्रे खोटे आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व अशा निविदाधारकांचे नाव काळ्या यादीत समावेश केला जाईल.

**जिल्हा क्रीडा अधिकारी,**
**धुळे.**

# प्रशिक्षण संस्थेचे पात्रतेचे निकष

१. प्रशिक्षण संस्था ही कंपनी ॲक्ट नुसार नोंदणीकृत प्रायव्हेट लिमीटेड कंपनी किंवा प्रोप्रायटर फर्म असावी.

२. या योजने अंतर्गत दोन संस्थांची संयुक्त भागीदारी ( Joint Venture ) ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. संस्थेने मागील तीन वर्षाचे ( २०१९-२०, २०२० – २१ आणि २०२१ – २२ ) आयकर विवरणपत्र भरलेले असावे,

४.संस्थेची जी.एस.टी नोंदणी झालेली असणे बंधनकारक आहे.

५. प्रशिक्षण संस्थेकडे ऑनलाइन प्रशिक्षणासाठी सर्व आवश्यक सुविधा (हायस्पीड इंटरनेट सह) असणे गरजेचे आहे.

६. संसथेकडे जागा स्वत:च्या मालकीची / भाडयाची असणे बंधनकारक राहिल. संस्थेची निवड झाल्यास मालमत्ता कर पावती व भाडे तत्वावर असेल तर नोंदणीकृत केलेला भाडेकरार जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांचेकडे निवड झाल्यानंतर जमा करणे बंधनकारक असेल.

७.प्रशिक्षण संस्थेकडे आवश्यक प्रमाणात अंशकालिन अनुभवी तज्ञ प्रशिक्षक वर्ग असणे आवश्यक आहे.

८.प्रशिक्षण संस्थेचा अनुभव तसेच संस्थेत प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांची / व्याख्यातांची शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. बायोडेटा व प्रमाणपत्रांच्या प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे. ( परीशिष्ट – अ ( २ ) मध्ये माहीती सादर करावी. )

९. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेकडे सरळसेवा परीक्षा तसेच एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. परीक्षा प्रशिक्षण देण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१०. मागील पाच वर्षामध्ये संस्थेने प्रशिक्षित केलेले किमान ३० उमेदवार यु.पी.एस.सी / एम.पी.एस.सी ( राज्यसेवा ) परीक्षेच्या अंतिम निकालात यशस्वी झालेले असावे.

११. संस्थेची ची मागील ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल ही किमान ५०.०० लक्ष असावी, यासाठी मागील ३ वर्षांचे ( २०१९ – २० ते २०२१ – २२ ) प्राप्तीकर परतावा भरलेले विवरणपत्र

१२. **Minimum Success Rate (MSR)** : आवेदनकर्त्या संस्थेने जर ही निविदा प्रसिध्द होण्यापूर्वी कोणत्याही शासकीय संस्थेद्वारे प्रायोजित कोणत्याही एमपीएससी किंवा यूपीएससी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचा कार्यक्रम / योजना राबविली असेल तर त्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा Minimum Success Rate (MSR) कमीत कमी पूर्व परीक्षेसाठी 25%, मुख्य परीक्षेसाठी 10% व अंतिम निकाल जाहिर झाला असल्यास त्यामध्ये किमान 5% (किंवा परीक्षेत एकूण उपलब्ध पदसंख्येच्या 5% यांपैकी कमी असेल ती संख्या) असणे बंधनकारक आहे. **अन्यथा सदर संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही.** जर आवेदन कर्त्या संस्थेने एकापेक्षा अधिक वर्गासाठी किंवा कालावधीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला असेल तर MSR सरासरी वरीलप्रमाणे असावा.

**१३. MSR संबंधी संस्थेने पुढील कागदपत्रे सोबत जोडावीत**

1. कार्यारंभ आदेश
2. प्रशिक्षणार्थींचे प्रायोजित स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश घेतलेले पुरावे, यादी (वर्षनिहाय/ कालावधीनिहाय)
3. प्रशिक्षणार्थींनी ज्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे त्या परिक्षेतील अंतिम निवड यादीतील नाव, निकाल व इतर आवश्यक कागदपत्रे. ( परीशिष्ट – अ ( ३ ) मध्ये माहीती सादर करावी. )

# <u>ऑनलाईन निविदेत सादर करावयाची कागदपत्रे</u>

## (तांत्रिक कागदपत्रे)

**१.** तांत्रिक कागदपत्राअंतर्गत निविदाकाराने निविदाअर्जासोबत असलेला विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीचा अर्ज, बँक तपशील आणि अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वत: निविदाकाराने स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र.

**२.** अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्रावर सर्व माहीती भरुन सदर बंधपत्र स्कॅन करुन सादर करणे बंधनकारक आहे.

**३.** निविदाकाराने कामाचा अनुभव असल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र यामध्ये कामाचे आदेश, संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रशिक्षणार्थींच्या नावांची यादी तसेच प्रशिक्षणार्थींनी ज्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे, त्या परीक्षेतील अंतिम निवड यादीतील नांवे , परीक्षेचा निकाल व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावे. तसेच याबाबत इतर वैध पुरावे सादर करणे बंधनकारक आहे.

**४.** निविदा फी रु. १५,००० /- तसेच बयाना रक्कम रु. २,२५,०००/- जिल्हा क्रीडा अधिकारी, धुळे यांच्या खात्यात ऑनलाईन गेटवे पध्दतीने भरणा करुन त्या बाबतची पावती स्कॅन करुन सादर करावी.

**५.** प्रशिक्षण संस्थेने व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक, मागील ३ वर्षाचे ताळेबंद आणि मागील ३ वर्षातील (२०१९-२० ते २०२१-२२) सरासरी किमान रु. ५०.०० लाख उलाढालीची माहीती सक्षम लेखापरीक्षकाच्या (सी.ए.) स्वाक्षरीने ऑनलाईन सादर करावी.

**६.** संस्थेकडे उपलब्ध असलेली साधन सामुग्री ( हायस्पिड इंटरनेट ) , किमान ३०० चौ.फुट आकाराचा डिजिटल स्टुडीओ , दृकश्राव्य सुविधा तसेच तज्ञ मनुष्यबळाची त्यांच्या शैक्षणिक अहर्तेसह सविस्तर माहिती विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन सादर करावी.

**७.** निविदाकाराने वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे,

**८.** निविदाकार यांनी पॅनकार्डची सत्यप्रत ऑनलाईन सादर करावी.

**९.** संस्थेस काळ्यायादीत न टाकल्याबाबत/ बंदी न घातल्याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांकावर घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

**१०.** सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा जिल्हा वार्षिक योजना २०२२ – २३ अंतर्गत नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत राबविण्यात येत असल्याने, ही निविदा शासन निर्णय क्रमांक डिएपी १०१४ / प्र.क्र. ११८/ का. १४८१ दिनांक **२७ ऑगस्ट २०१४ मधील अटी** व शर्तींच्या अधिन असेल. निविदाधारकाने निविदा भरण्याआधी हा **शासन निर्णय** वाचुन घेणे अपेक्षित आहे. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय https://gr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील प्रमाणे १ ते १० नुसार सर्व प्रमाणपत्र/ हमीपत्र स्व-साक्षांकनासह तांत्रीक लिफाफयामध्ये सादर करण्यात यावे.

**जिल्हा क्रीडा अधिकारी,**
धुळे

# <u>व्यापारी लिफाफा माहीतीचा (दरांचा) तपशिल</u>

१) ऑनलाईन सादर केलेली सर्व तांत्रिक कागदपत्रे तपासणीनंतर, निविदा समितीस निविदाकाराने सर्व अटी व कागदपत्रांची पुर्तता केल्याचे आढळल्यासच निविदाकाराने ऑनलाईन सादर केलेल्या व्यापारी माहीतीची ( दरांची) पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

२) प्रपत्र – २ मध्ये जोडलेल्या माहितीप्रमाणे निविदाकाराने प्रती विद्यार्थी प्रमाणे प्रशिक्षणाचे दर द्यावेत. दर हे **रुपये** यामध्ये दर्शवावे. दर देताना तो अक्षरी व अंकी लिहावा. एकदा दर सादर केल्यास त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. अंक्षरी व अंकी दरात फरक आढळून आल्यास दोन्ही पैकी कमी असलेला दर विचारात घेतला जाईल. ज्यांचे दर संदिग्ध असतील अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) दर सादर करताना ते जी.एस.टी करासह सादर करावे.

**जिल्हा क्रीडा अधिकारी,**
**धुळे.**